## अनुसूची—दोन

### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | ईटारसी - नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकाम |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :- | ईटारसी - नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकामाबाबत |
| समाजाला मिळणारे लाभ | : | ईटारसी नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकाम भारतीय रेल्वे अंतर्गत असुन योजनेची वाहतुक/रहदारी क्षमता वाढविण्याची उद्यीष्ट साध्य करणेसाठी उक्त रेल्वे लाईनचे बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. |

## अनुसूची—तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- **विस्थापीत होत नाही**

## अनुसूची — चार

### (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

**मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र एलएसी/कार्या-25/कावि** -1057/2020 **दिनांक** 06/01/2020

**टिप:-** उक्त जमिनीच्या नकाश्याचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सावनेर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**ठिकाण :- नागपूर**

**दिनांक** :- 04/06/2021

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी, सावनेर**

# अधिसूचना

उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,
सावनेर यांचे कार्यालय, सावनेर
दिनांक :-04/06/2021.

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 19(1) ची अधिसुचना प्रसिद्ध करण्याकरीता.**

**क्र.अ.का.-2/उविअ/सा./कावि-**154 /2021, **दिनांक** -04/06/2021.

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 (2013 चा 30) आणि (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम 11 च्या पोटकलम (1) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, **अधिसूचना क्र.अ.का./भु.स./उविअ सावनेर/कावि-247/2020, दिनांक 29/06/2020** अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या गावठाणा मधील जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नागपूर जिल्हाधिकाऱ्याने, कलम 15 च्या पोटकलम (2) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणाची जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम 19 च्या पोटकलम (1) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त गावठाणच्या जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी श्री. अतुल म्हेत्रे, उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी, सावनेर यास पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूचि-एक
## जमिनीचे वर्णन

**गाव :- उबगी, प.ह.न. 15 तालुका :- कळमेश्वर, जिल्हा :- नागपूर,**
**भूसंपादन प्रकरण क्रमांक :-** 06/अ-65/2019-2020

| अ.क्र. | सर्व्हे क्र. किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | 215/1 | 0.0015 |
| | एकुण | 0.0015 |